# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर शहरातील तलावांचे पर्यावरणीय संवर्धन, संरक्षण व प्रदूषण
**{सा.आ.अभि.विभाग}** निर्मुलनाच्या दृष्टीने कृती आराखडा तयार करुन पर्यावरणीय सुधारणा करण्याबाबत निरी या संस्थेकडुन महानगरपालिकेस प्रस्ताव प्राप्त झाला होता.

सदर प्रस्तावांतर्गत नागपूर शहरातील तलावांचे पर्यावरणीय संवर्धन, संरक्षणाच्या दृष्टीने कृती आराखडा तयार करुन शहरातील तलावांच्या पर्यावरणीय बाबींचा अभ्यास सर्वेक्षण, विश्लेषण करुन तलावातील प्रदूषण निर्मुलनाच्या दृष्टीने अल्प व दिर्घकालीन उपाय योजना राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाकरीता निरी या संस्थेस रु. ५०.०० लक्ष व जी. एस. टी. १८% असे एकुण ५९.०० लक्ष चा खर्च येणार आहे. सदर कामास येणारा खर्च नागपूर महानगरपालिकेच्या अंदाज पत्रकीय पद क्र. A४६२०१९६०४०१/४१५ अन्वये करण्यात येणार आहे.

सबब सदर कामावर येणाऱ्या रु. ५०.०० लक्ष व जी.एस.टी १८% असे एकुण रु. ५९.०० लक्षच्या खर्चास मंजूरीचा प्रश्न विचारात घेणे.
टीप :- सविस्तर टिपणी नस्तीमध्ये संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 260/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 14/02/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (पर्यावरण), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील तलावांचे पर्यावरणीय संवर्धन, संरक्षण व प्रदूषण निर्मुलनाच्या दृष्टीने कृती आराखडा तयार करुन पर्यावरणीय सुधारणा करण्याबाबत निरी या संस्थेकडुन महानगरपालिकेस प्रस्ताव प्राप्त झाला होता.

सदर प्रस्तावांतर्गत नागपूर शहरातील तलावांचे पर्यावरणीय संवर्धन, संरक्षणाच्या दृष्टीने कृती आराखडा तयार करुन शहरातील तलावांच्या पर्यावरणीय बाबींचा अभ्यास सर्वेक्षण, विश्लेषण करुन तलावातील प्रदूषण निर्मुलनाच्या दृष्टीने अल्प व दिर्घकालीन उपाय योजना राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाकरीता निरी या संस्थेस रु. ५०.०० लक्ष व जी. एस. टी. १८% असे एकुण ५९.०० लक्ष चा खर्च येणार आहे. सदर कामास येणारा खर्च नागपूर महानगरपालिकेच्या अंदाज पत्रकीय पद क्र. A४६२०१९६०४०१/४१५ अन्वये करण्यात येणार आहे.

सबब सदर कामावर येणाऱ्या रु. ५०.०० लक्ष व जी.एस.टी १८% असे एकुण रु. ५९.०० लक्षच्या खर्चास मंजूरी करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**